विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर,( स्वायत्त )

समाजशास्त्र विभाग

(बी ए भाग ३)

दिनांक १४/ १०/२023

समाजशास्त्र विभागातील बी ए भाग 3- मधील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की,दिनांक १५/१०/२०२३ रोजी रुम न २६ सकाळीं १० वा.पेपर न ११ "धर्मनिरपेक्षता" या विषयावर ओपन युनिट टेस्ट घेण्यात येईल तरी आपण सर्वांनी टेस्ट देणे अनिवार्य आहे.

प्रा चामे एच व्ही

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

Vivekanand College, Kolhapur, [Empowered Autonomous]

Department of Sociology

B A Part III SEM NO 05

Unit Test 2023-2024

Political sociology paper no 11

| Sr No | Name of the student | Mark |
|---|---|---|
| 1. | Mrunal Sachin kamble. | 07 |
| 2. | Arma Rafic Mujawar | 12 |
| 3. | Rohan Kamble | 08 |
| 4. | Sanika Arun Patil | 09 |
| 5. | Deepali Mohan Prasad | 08 |
| 6. | Apurva A Mangolikar | 13 |
| 7. | Sanika Eknath Ulape | 09 |
| 8. | Gawri Shahaji Padwal | 08 |
| 9. | Sakshi Rahul Kumbhar | 11 |
| 10. | Richa Rajesh Chavan | 12 |
| 11. | Sandhya. Rajaram. Jadhav. | 08. |

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

Scanned with OKEN Scanner

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे**

विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर,(स्वायत्त)

समाजशास्त्र विभाग

बी. ए. भाग -३

(राजकिय समाजशास्त्र - पेपर न -११)

**युनिट टेस्ट - २०२३-२४**

मार्क 10

वेळ -१ तास.

---

प्रश्न.१ : धर्मनिरपेक्षता म्हणजे काय? त्यावर सविस्तर माहिती लिहा.

किंवा

प्रश्न. २. लोकशाही म्हणजे काय ते सांगुन त्याची वैशिष्ट्ये सांगा?

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with OKEN Scanner

08/10

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।।
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

46047

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

## SUPPLIMENT

नाव - संध्या राजाराम जाधव

Suppliment No. :

Roll No. : 4356

Class : B.A III year

Signature of Supervisor

Subject : समाजशास्त्र

Test / Tutorial No. : Unit test

Div. : राजकीय समाजशास्त्र

धर्मनिरपेक्षता म्हणजे काय सांगुन त्यांची संकल्पना स्पष्ट करा.

व्याख्या -

पंडित नेहरू - " प्रत्येक धर्माच्या व्यक्तीला आपल्या व्यक्तीगत धर्माचे, विधीचे स्वातंत्र्य आहे पण ती व्यक्ती कोणताही धर्म स्वीकारू शकते "

मौलाना अबुल - " प्रत्येक नागरिक कोणत्याही धर्माचा असो त्या सर्वांना समान नागरी अधिकारी प्राप्त होणे म्हणजेच धर्मनिरपेक्षता होय "

महात्मा गांधी - " सर्वधर्मसमभाव म्हणजेच धर्मनिरपेक्षता होय. म्हणजेच प्रत्येक नागरिकास कोणताही धर्म स्वीकारण्याचा अधिकार आहे, पण सर्वांनी सर्वसामान्य कायद्याचे पालन करणे अगत्याचे आहे. "

ऑक्सफोर्ड शब्दकोश - " धर्मनिरपेक्षता म्हणजे शासन, नितिनियम, शिक्षण आदी क्षेत्रे धर्मापासुन स्वतंत्र असणे होय "

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with OKEN Scanner

धर्मनिरपेक्षता अर्थ व स्वरूप -

विसाव्या शतकात जगाची विभागणी प्रामुख्याने साम्यवादी राष्ट्रे, धार्मिक राष्ट्रे आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रे अशा तीन प्रकारांमध्ये होऊ लागली. साम्यवादी राष्ट्रांत धर्माला स्थान नाही. मज्जीद, मंदिरे, चर्चेस या सर्व धार्मिक संस्थावर बंदी असते. धार्मिक सण - समारंभ, उत्सव आदी सोहळे साजरे करण्यास परवानगी नसते.

भारतीय प्रजासत्ताकाची स्थापना लोकशाही, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद व समाजवाद या तीन तत्वांच्या आधारावर झालेली आहे. भारतात नवा आधुनिक व प्रगमनशील समाज स्थापन करावयाचा असेल तर या तीन तत्वांची जोपासना करणे व त्याचा आधारे आपल्या व्यवहार करणे गरजेचे आहे.

संविधानात धर्मनिरपेक्षतेचा जो अर्थ अंतर्भूत केला आहे त्यात प्रामुख्याने पुढील गोष्टी आहेत.

1) राज्यसत्तेचा स्वतःचा असा कोणताही धर्म असणार नाही म्हणजेच राज्यकर्ते राज्याचा धर्म म्हणून कोणत्याही धर्माला मान्यता देणार नाहीत.
2) शासन कोणत्याही प्रकारे धर्माला आर्थिक मदत करणार नाही.
3) राज्यातील सर्वांना व्यक्तीगत व सामुदायिक धर्माचरणाचे स्वातंत्र्य आहे.
4) सार्वजनिक मालमत्तेचा लाभ घेण्यासाठी धर्माला कोणतेच महत्व दिले जाणार नाही.
5) शासनाच्या निर्णय प्रक्रियेत धर्मसंस्थेला हस्तक्षेप करु दिला जाणार नाही.
6) सर्वसाधारण परिस्थितीत राज्यसत्ता धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप करणार नाही.
7) जर वैयक्तिक वर्तनावर धर्माद्वारे निर्बंध आले तर शासन त्यास विरोध करेल.

स्वरूप -

अगदी प्राचीन काळापासून भारतवर्ष या नावाने ओळखला जाणारा भारत हा खंडप्राय देश हा देश एक असला तरी त्यामध्ये अनेक प्रकारची विविधता भौगोलिक, भाषिक,

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964

Scanned with OKEN Scanner

जाती, धर्म, पंत, वंश यासारख्या अनेक बाबी आपल्याला आढळून येतात.

1) हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, जैन, पारशी अशा विविध धर्मामध्ये काही मूलभूत गोष्टी समान असल्या तरी श्रद्धा, आचार, कर्मकांडे याबाबत विभिन्नता दिसून येते. या विभिन्नतेमुळे काही लोक स्वतःच्या धर्माचा फाजील अभिमान बाळगतात व दुसऱ्याच्या धर्माचा तिरस्कार करतात.

2) धर्मनिरपेक्षतेचा आधार धर्म व राज्य यांच्यातील अंतर्विरोध नसून विविधतेतील एकात्मता हा आहे. या एकात्मतेची सर्जनशील भूमिका हा त्या संकल्पनेचा प्रमुख आधारस्तंभ आहे.

3) भारतात धर्मा- धर्मात संघर्ष होतात, त्यामुळे नाहक अनेकांचे बळी जातात व प्रचंड प्रमाणात सार्वजनिक मालमत्तेची हानी होते.

4) भारतात लोकशाहीचे अस्तित्वच संभवत नाही. धर्मनिरपेक्षतेची जी काही पिछेहाट अलीकडे भारतीय समाजामध्ये झालेली आहे ती अनेक दृष्टींनी अत्यंत विपरीत परिणाम करणारी आहे.

5) भारतीय समाजामध्ये जातीधर्माचा राजकारणासाठी उपयोग करून घेतला जात आहे. निवडणुका किंवा कोणतेही सार्वजनिक पद प्राप्त करून घेताना जातीचे अथवा धर्माचे माध्यम वापरले जाते.

6) जमातवाद्यांची भूमिका अशी आहे की, ते धर्माचा राजकारणासाठी वापर करून घेतात. जमातवाद्यांना राष्ट्र किंवा राष्ट्रराज्य यापेक्षा धार्मिक समुदाय हाच राष्ट्रीय निष्ठांचा केंद्रबिंदू वाटतो.

7) थोर राजनितीतज्ञ व तत्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची धर्मनिरपेक्षते-बाबतची भूमिका आणि विचार यांचा विवेचनावरून धर्मातील राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेचे महत्व लक्षात येते. कोणत्याही एका धर्माला प्राधान्य दिले जाऊ नये, कारण हा लोकशाहीच्या मूलभूत तत्वांचा भंग होईल. तसेच सार्वजनिक जीवन सर्व लोकांना समान प्रमाणात उपलब्ध पाहिजे. धर्म आणि

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with OKEN Scanner

राज्यसत्ता यांच्या विभक्तीकरणात हेच मूलभूत तत्व अंतर्भूत आहे.

राष्ट्र निर्माण करण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची गरज -

धार्मिक अस्मितेमुळे भारतीय समाजापुढे बरीचशी आव्हाने निर्माण झाली आहेत. ती आव्हाने समाजाला पेलण्याचा एकमेव मार्ग आहे तो म्हणजे धर्मनिरपेक्षतेचा आचारविचारात प्रामाणिक अवलंब केला जाणे. दैनंदिन सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा विचार धार्मिक संदर्भातूनच करण्याची जी सवय भारतीयांना जडली आहे ती प्रयत्नपूर्वक मोडून द्यावी लागेल. विशुद्ध धर्मांच्या समन्वयाची भाषा तात्त्विक पातळीवर ठीक असते. प्रत्यक्षात ती पारंपारिक धर्मवाद्यांचेच हात बळकट करते आणि समन्वयातील मूळ हेतूवरच आघात करते, त्यामुळे भारतासारख्या बहुधर्मीय देशात केवळ धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनच ऐक्याचे अधिष्ठान ठरू शकतो.

08

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with OKEN Scanner